**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक २१ मे २०२५**

**ठळक बातम्या**

1. ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर भारताची बाजू जगभरात मांडण्यासाठी शिष्टमंडळं रवाना होण्यास सुरुवात.

2. अमृत भारत स्थानक योजने अंतर्गत १०३ पुनर्विकसित रेल्वे स्थानकांचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या करणार, नागपूरच्या इतवारी स्थानकाचा समावेश.

3. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेत खरीप हंगाम पीक आढावा बैठक संपन्न, बोगस बियाण्यांपासून शेतकऱ्यांचा बचाव करण्यासाठी 'साथी' पोर्टलचा अवलंब करणार.

4. छत्तीसगडमधे झालेल्या चकमकीत वीसपेक्षा जास्त माओवादी ठार, एक जवान शहीद.

---------------------------------------------

**ऑपरेशन सिंदूर**

ऑपरेशन सिंदूरची माहिती सर्व देशांना देण्यासाठी आणि पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद जगासमोर आणण्यासाठी भारतानं आखलेल्या धोरणांतर्गत संयुक्त जनता दलाचे खासदार संजय झा यांच्या नेतृत्वाखालचं सर्वपक्षीय शिष्टमंडळ आज पाच देशांच्या दौऱ्यासाठी रवाना झालं. हे शिष्टमंडळ इंडोनेशिया, मलेशिया, कोरिया, जपान आणि सिंगापूरला भेट देईल. रवाना होण्यापूर्वी संजय झा यांनी वार्ताहरांशी संवाद साधला. शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालचं शिष्टमंडळही आज रवाना होणार आहे. हे शिष्टमंडळ संयुक्त अरब अमिराती, काँगो, लायबेरिया आणि सिएरा लिओन या देशांना भेट देईल. या धोरणांतर्गत एकूण सात सर्वपक्षीय शिष्टमंडळं ५ जूनपर्यंत ३२ देशांना भेट देऊन भारताची भूमिका समजावून सांगणार आहेत.

---------------------------------------------

**अमृत भारत स्टेशन**

पंतप्रघान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अमृत भारत स्टेशन योजने अंतर्गत १८ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील १०३ रेल्वे स्थानकांच्या पुनर्विकास कामांचं उद्या दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून उद्घाटन करण्यात येणार आहे. पुनर्विकसित कामांमध्ये सुखकर विश्रामगृह, स्वच्छ स्वच्छता गृह प्रवाशांना उपलब्ध होणार आहेत. तसंच गाड्यांच्या थांब्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातील चांदा फोर्ट, शीवनी, डोंगरगड, खामगाव आणि नेताजी सुभाषचंद्र बोस इतवारी या स्थानकांचे लोकार्पण होणार आहे अशी माहिती विभागीय रेल्वे व्यवस्थापक दिपक कुमार गुप्ता यांनी दिली आहेत. फेब्रुवारी 23 मध्ये या प्रकल्पाला सुरुवात झाली होती. सोबतच प्रवासी सुविधांचा विस्तार केला जात आहे. अडीच वर्षात नेताजी सुभाष चंद्र बोस इतवारी स्थानका सह देशातील रेल्वे स्थानकांचे काम पूर्ण झाले आहे. या पुनर्विकसीत स्थानकाचे पंतप्रधानांच्या हस्ते लोकार्पण केले जात आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस इतवारी रेल्वे स्टेशनवर आत आणि बाहेर जाण्यासाठी दोन वेगवेगळे रस्ते तयार करण्यात आलेले आहे. पार्किंग सुविधा देखील प्रशस्त करण्यात आलेली आहे. दिव्यागजनांसाठी देखील पार्किंग आणि आतमध्ये प्रवेश करण्यासाठी रस्ता तयार करण्यात आला आहे. फलाट देखील मोठे करण्यात आलेले आहे. प्रतीक्षालय देखील महिला आणि पुरुषांसाठी वेगळे ठेवण्यात आलेले आहे.

---------------------------------------------

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस खरीप पिक आढावा बैठक

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज राज्याची खरीप पिक आढावा बैठक संपन्न झाली. यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांची देखील उपस्थिती होती. राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात बोगस बियाण्याला आळा घालण्यासाठी केंद्र सरकारच्या धरतीवर यंदा साथी पोर्टलचा अवलंब करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली.

(होल्ड बाईट फडणवीस )

*वारंवार बोगस बियानाचे प्रकार बाहेर येतात म्हणून महाराष्ट्राने पहिल्यांदा एक प्रयोग केलेला आहे, केंद्र सरकारची साथी. हे एक साथी पोर्टल आहे या पोर्टलवर जी काही बियाण आहे त्याचं रजिस्ट्रेशन करावा लागतो. म्हणजे नेमकं त्याच उत्पादन कुठे झालेलं आहे हे आपल्याला त्याच्यावरुण ट्रेस करता येईल. महाराष्ट्राच्या कृषी विभागाने या चेक ट्रुथफूल बियाण आहेत हे साथी पोर्टलवर आणावं लागेल असा नियम केलं. केंद्राने देखील मान्यता दिली.*

---------------------------------------------

मन की बात

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी मन की बात या कार्यक्रमाद्वारे येत्या रविवारी जनतेशी संवाद साधणार आहेत.श्रोते या कार्यक्रमासाठी त्यांच्या सूचना १ ८ ० ० १ १ ७ ८ ० ० या टोल फ्री क्रमांकावर पाठवू शकतात. नरेंद्र मोदी ॲप आणि माय गव्ह ॲपद्वारेही आपल्या सूचना २३ मे पर्यंत पाठवता येतील.

-------------------------------------------

दत्तात्रय भरणे

वाशिम जिल्ह्याचे अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून असून शेतकऱ्यांच्या मालाला चांगला भाव मिळावा या उद्देशाने वाशिम येथे शेती शिल्प कक्षाची उभारणी करण्यात येणार आहे. अशी माहिती वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आणि शेतकर्त्यांनी याचा उपयोग करून घेण्याचे आवाहन केले. --

(होल्ड बाईट १९ सेकंद )

*या कक्षामुळे शेतकऱ्यांना बाजारपेठ माहिती केंद्र स्थापन होईल. शेतकरी आणि खरेदीदार यांच्यात थेट संपर्क सुलभ होईल. देशांतर्गत व देशाबाहेर विपणन पद्धती नसता प्रोत्साहन मिळेल, काढणीपश्चात नुकसान कमी होईल. शेतकरी उत्पादक संघटनांनी प्रोत्साहन मिळेल. स्थानिक शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे हा यामागील उद्देश आहे.*

-------------------------------------------

तिरंगा यात्रा

ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तानला धडा शिकवणाऱ्या भारतीय लष्कराच्या जवानांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी नागपूर शहर कॉँग्रेस व जिल्हा ग्रामीण कॉँग्रेस तर्फे आज माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनी कॉँग्रेस चे शहराध्यक्ष विकास ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली 'तिरंगा यात्रा' काढण्यात आली. यावेळी विकास ठाकरे यांनी माध्यमांशी संवाद साधला.

(होल्ड बाईट ३० सेकंद)

*देश के माजी पंतप्रधान राजीवजी गाँधी इनकी पुण्यतिथि है। उन्हें हम सब लोग आदरांजलि अर्पित करते हुए जो देश में आतंकी घटना, घड़ी और उसमें हमारे देश के 28 पर्यटक लोग जो जम्मू गए थे। उन्हें अपनी जान गवानी पड़ी और उसका बदला लेने के लिए भारत ने जीस तरीके के जो जवानों ने हमारी कामगिरी दिखाई, उनके अभिनन्दन के लिए ये रैली का आयोजन कांग्रेस पार्टी की ओर से किया गया।*

नागपूरातील भारत मातेच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केल्यानंतर भारत माता चौक ते शहीद चौक 'तिरंगा यात्रा' काढण्यात आली. तिरंगा यात्रेत काँग्रेस चे आमदार अभिजीत वंजारी , सेवा दल, महिला काँग्रेस, युवक काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते या तिरंगा यात्रेत सहभागी होते.दरम्यान भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वाशिम जिल्हा समितीच्या वतीने जिल्हाध्यक्ष आमदार अमित झनक यांच्या नेतृत्वात आज  वाशीम येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून तिरंगा यात्रा काढण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून या यात्रेचा प्रारंभ झाला.  या रॅलीमध्ये माजी सैनिकांची सामाजिक संस्था त्रिदीप माजी सैनिक कल्याण संस्थेने आपली उपस्थिती नोंदवली.

-------------------------------------------

२० नक्षलवादी ठार

छत्तीसगडच्या नारायणपूर, विजापूर आणि दंतेवाडा भागात सुरक्षादलांशी ५० तासांपेक्षा जास्त काळ चाललेल्या चकमकीत वीसपेक्षा जास्त माओवादी ठार झाले. यात काही कुख्यात माओवाद्यांचा समावेश असल्याची शक्यता आहे. यात एक जवान शहीद झाल्याची तर आणखी एक जवान जखमी झाल्याची माहिती छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री विजय शर्मा यांनी दिली आहे. ही कारवाई जवळपास संपल्याचं आणि या भागात मोठी शोधमोहीम सुरू असल्याचंही त्यांनी सांगितलं

-------------------------------------------

हवामान

आगामी काही तासात चंद्रपूर जिल्ह्यात काही ठिकाणी आणि वर्धा, गडचिरोली आणि गोंदिया जिल्ह्यांतील एक-दोन ठिकाणी विजा वादळी वाऱ्यासह  आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. चंद्रपूर जिल्ह्यात अनेक ठिकाणी तर यवतमाळ, गडचिरोली आणि गोंदिया जिल्ह्यांतील एक-दोन ठिकाणी हलक्या पावसाच्या सरी बरसण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागान वर्तवली आहे.

-------------------------------------------

आयपीएल टी-२०

आयपीएल टी-२० क्रिकेटमध्ये आज मुंबई इथं मुंबई इंडियन्सचा सामना दिल्ली कॅपिटल्सशी होणार आहे. दिल्ली आणि मुंबई संघांना प्लेऑफ फेरीतील स्थान निश्चित करण्यासाठी हा सामना महत्त्वाचा आहे. सायंकाळी साडेसात वाजता होणाऱ्या

सामन्यावर पावसाचं सावट आहे. दरम्यान, बीसीसीआयनं साखळी फेरीतील उर्वरीत सामन्यांची वेळ दोन तासांनी वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.

---------------------------------------------

डॉ. जयंत नारळीकर

ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांच्यावर आज पुण्यातल्या वैकुंठ स्मशानभूमीत संपूर्ण शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यापूर्वी बंदुकांच्या फैरी झाडून त्यांना मानवंदना देण्यात आली. आज सकाळी त्यांचं पार्थिव आयुका इथं अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आलं होतं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्यासह इतर मान्यवरांनी डॉ. नारळीकरांचं अंत्यदर्शन घेतलं. डॉ. नारळीकर यांचं वयाच्या ८६व्या वर्षी काल पुण्यात त्यांच्या राहत्या घरी निधन झालं होतं.

---------------------------------------------